# प्रकरण - ७

# उपसंहार

# प्रकरण - ७

# उपसंहार

## प्रस्तावना

प्रस्तुत अभ्यासात आपण आतापर्यंत एकूण पंच्याऐंशी आत्मचरित्रे, आणि बारा आत्मकथनांतील आई, बहीण, पत्नी, मुलगी ही स्त्रीरूपे पाहिली. या स्त्रीरूपांची पाहणी करून काढलेले निष्कर्ष हे आत्मचरित्रकार सत्याशी प्रामाणिक राहून लेखन करत आहेत, असे गृहीत धरून काढले आहेत. कारण आत्मचरित्रातील कथनाशी विसंगत असे काही आधार सहजपणे समोर आले. पैकी आनंद साधले आपल्या आत्मचरित्रात आई, बहिणी, पत्नी, मुली यांच्याविषयी ज्या अभिनिवेशाने लिहितात त्यावरून त्यांची स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी स्त्रीवादाच्या जवळ जाणारी आहे असा निष्कर्ष निघतो. पण त्यांनीच साहित्यसूचीच्या दिवाळी १९८७ च्या अंकात 'चूल मातीची मोल मोत्याचे' या लेखात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना आत्मचरित्र लिहिण्यापूर्वीच त्यांच्यात आणि त्यांच्या पत्नीत बेबनाव झाल्याचे दिसते. मा. ल. भागवत हे आपल्या पत्नीच्या समाजकार्यास आपल्या आत्मचरित्रात गौरवतात. पण त्यांच्या पत्नी मंगला भागवत मात्र आपल्या आत्मचरित्रात आपल्या पतीचा समाजकार्याला विरोध होता असे नोंदवतात. ग. य. चिटणीस आपल्या आत्मचरित्रात लीला चिटणीसांशी लग्न होण्यापूर्वी आपले लग्न झाले होते याचा उल्लेख करत नाहीत. लीला चिटणीस त्यांच्या आत्मचरित्रात असा उल्लेख करतात. अशाच विसंगती इतर आत्मचरित्रातील वास्तवाच्या बाबतीत शक्य आहे.

म्हणून स्त्रीवादी दृष्टिकोनातून पुनर्वाचन करत असताना ज्या पती-पत्नींनी आत्मचरित्रलेखन केले आहे त्यांचा अभ्यास करून पुरुषांच्या आत्मचरित्रातील अशा विसंगतींचा शोध घेणे परिणामकारक होईल. एखाद्या विशिष्ट प्रसंगाबद्दल पतीच्या आणि पत्नीच्या प्रतिक्रिया कोणत्या आहेत. त्यावर ते भाष्य करतात की अनुल्लेखाने वादाचे प्रसंग टाळतात. यावर त्यातून प्रकाश पडेल. पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुषांच्या आत्मचरित्राचे पुनर्वाचन करण्याची ही एक महत्त्वाची दिशा ठरणार आहे. विश्राम बेडेकर यांनी त्यांची पत्नी बाळूताई यांचे आत्मचरित्र विश्राम बेडेकर यांनी ते चांगले नाही असे म्हटल्यामुळे टाकून दिले. असे श्री. विजय कुवळेकर यांच्या लोकसत्ता मधील 'प्रेमळ तेजस्विनी' या लेखावरून दिसते. (लोकसत्ता - ८ मे २००१) पतीच्या प्रतिकूल मतामुळे वाचकांसमोर न आलेल्या स्त्रियांच्या आत्मचरित्राची संख्याही लक्षणीय असण्याची शक्यता आहे.

आत्मचरित्रातील ही स्त्रीरूपे एका विशिष्ट कालखंडातील समाजमानसातील आदर्शांचे आणि वास्तवाचे संमिश्र दर्शन घडवतात. इ. स. १९४७ ते १९८५ या कालखंडात ज्यांनी आत्मचरित्रलेखन केले आहे त्यांच्या व्यक्तित्त्व घडणीचा आणि कर्तृत्वाचा कालखंड प्रामुख्याने विसाव्या शतकाचे पहिले अर्धशतक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्थानात समाजसुधारणेच्या चळवळीस

वेगाने सुरुवात झाली. या सुधारणा प्रामुख्याने स्त्रीसंबंधी सुधारणा होत्या. बालविवाहाची प्रथा, विधवा-केशवपन यांसाठी बंदी तर संमतीवयासंबंधी चर्चा होऊन त्या सुधारणा अपवादात्मक का होईना प्रत्यक्ष अमलात आणण्यास सुरूवात झाली होती. स्त्रियांच्या शिक्षणाविषयी चर्चा होऊन त्यांना प्रत्यक्ष शिक्षण देण्यास सुरूवात झाली होती. मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या गेल्या होत्या.

शतकानुशतके येथील स्त्रियांवर जी विविध बंधने घातली गेली होती ती काही प्रमाणात शिथिल व्हावयास यामुळे प्रारंभ झाला. या सुधारणांमधील आदर्शाचा प्रभाव, समकालीन बदलत्या वास्तवाचा परिणाम आत्मचरित्रकारांच्या लेखनातून कसा, कितपत दिसतो हे पाहण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केला.

भारतातील समाजसुधारकांचा स्त्रियांच्या दु:खाकडे पाहण्याचा दृष्टिकोन इंग्रजी शिक्षणातून तर अपवादात्मक ठिकाणी ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या प्रभावाने घडलेला दिसतो. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेतून आणि उच्चवर्गीय स्त्रियांवरील बंधने दूर करण्याच्या प्रयत्नातून प्रामुख्याने महाराष्ट्रात स्त्रीवादाला सुरूवात झाली. येथील समाजसुधारकांनी आपापल्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे स्त्रीसुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही वेळा एखाद्या सुधारणेचा हिरीरीने पुरस्कार करणारे सुधारक दुसऱ्या बाजूने मात्र परंपराप्रिय मत मांडताना दिसतात. उदाहरणार्थ र. धों. कर्वे स्त्रियांसाठी समागम स्वातंत्र्याचा पुरस्कार करत असले तरी त्यांना समान हक्कांसाठी स्त्रियांनी चालवलेली चळवळ असमंजसपणाची वाटते. पातिव्रत्यासारखी मूल्ये झुगारून देताना दुसऱ्या बाजूने मात्र पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांविषयी ज्या अनेक अन्याय्य कल्पना रूढ केल्या आहेत त्यांचा कर्वे यांच्यावर पगडा आहे. त्यात स्त्री म्हणून ती अविश्वसनीय, तिला अन्यायाची जाणीव नसते यासारख्या मतांचा समावेश आहे. तसेच तिने स्त्रीत्व न सोडता आपल्या नैसर्गिक जबाबदाऱ्या आपल्याबद्दल वाटणारे आकर्षण टिकवून आणि वाढवून त्यांच्यावर सत्ता गाजवावी असा त्यांचा स्त्रियांना सल्ला आहे.

महात्मा फुलेही स्त्रीच्या मातृत्वामुळे स्त्रियांना श्रेष्ठ स्थान देतात. महात्मा गांधीही परंपरागत भूमिकेतून, मातृत्वाच्या भूमिकेतून स्त्रियांना श्रेष्ठपणा देतात. मग त्यासाठी स्वत: आई होणे नाही तर मातृत्व भावनेचा विस्तार करणे त्यांना आवश्यक वाटते. स्त्रीवर बलात्कार होत असेल तर तिने प्रतिकार न करता प्राणत्याग करावा अशी त्यांची अपेक्षा आहे. स्त्रीवर ते मांगल्य, पावित्र्य इत्यादि गुणांचे आरोपण करतात. शिक्षणासंदर्भातही स्त्रियांना व पुरुषांना वेगवेगळे शिक्षण असावे असे त्यांचे म्हणणे आहे.

धोंडो केशव कर्वे स्वत:ला आयुष्यभर स्त्रीशिक्षणाकरिता वाहून घेतात. पण हे शिक्षण स्त्रीच्या पारंपरिक भूमिका निभावणारे शिक्षण असावे असे त्यांना वाटते.

पुरुषांप्रमाणेच स्त्री एक माणूस आहे. त्यामुळे पुरुषांसाठी असणारे नियम तिला लावले जावेत अशी आधुनिक स्त्रीवादी भूमिका समाजसुधारक घेत नाहीत. समाजसुधारकांच्या या वैचारिक गोंधळाचे चित्र आत्मचरित्रातही दिसून येते. आत्मचरित्रकार एखाद्या सुधारणाविषयक विचार स्वीकारतात. त्यांचे इतर विचार मात्र परंपराप्रिय असतात. त्यामुळेच प्रजोत्पादन हे स्त्रीचे एकमेव नैसर्गिक कार्य सोडता

स्वयंपाकासारखी कामे पुरुषांनी करावीत, पत्नीला आपल्याबरोबर दरवर्षी प्रवासास न्यावे यासारखी सुधारकी मते मांडणारे घाणेकर तिला अर्थार्जनास मात्र तशी आवश्यकता असेल तरच परवानगी देतात. ते कामही तिच्या विनयास शोभेल असेच असावे असे त्यांना वाटते. तिचे स्वातंत्र्यही त्यांना मान्य नाही. अनेक आत्मचरित्रकारांना आपल्या पत्नीला शिक्षण असावे असे वाटते पण ते लिहिण्यावाचण्यापुरतेच असावे, जास्त शिक्षण असले तरी अर्थार्जनाची आवश्यकता असेल तरच तिने नोकरी करावी अशी अपेक्षा आहे. तसेच स्त्री शिक्षित असली तरी घरातील महत्त्वाच्या निर्णयात तिला स्थान नाही. आपण घेतलेले निर्णय तिने निमूटपणे स्वीकारावेत. पत्नीला बालसंगोपनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे अशाही ते अपेक्षा ठेवतात. उदाहरणार्थ द. शं. गोडबोले शिक्षिकेशी प्रेमविवाह करतात. तिला बालसंगोपनाचे ज्ञान असणे त्यांना आवश्यक वाटते. अशी अपेक्षा घाणेकर, वा. गो. मायदेव हेही व्यक्त करतात. तर अनेकजण आपल्या पत्नीच्या गृहकृत्याच्या कौशल्याचे उल्लेख करून स्त्रीला तोच गुण कसा योग्य ते अप्रत्यक्षरीत्या सुचवतात.

*<u>आई संदर्भातील निरीक्षणे : -</u>*

आत्मचरित्रकार आपल्या आईची कोणत्या ना कोणत्या रूपात दखल घेतात. प्रामुख्याने आईची थोरवी वर्णन करून तिच्या एखाद्या गुणाचे, कृतीचे उदात्तीकरण करण्याची प्रवृत्ती आत्मचरित्रकारांमध्ये दिसते. त्यामुळे तिने शिस्तीसाठी स्वीकारलेल्या कडकपणाचे जसे उदात्तीकरण आहे तसेच मायेपोटी चोरीसारखा अपराध पाठीशी घालण्याच्या वृत्तीचेही उदात्तीकरण आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीच्या बाह्यरूपाची जी कल्पना केली आहे त्यानुसार आईचे रूप नसले तरी तिच्या वास्तव रूपाचा ते स्वीकार करतात. रूपापेक्षा तिच्या गुणांची, चांगल्या स्वभावाची दखल घेतात. हे तिचे चांगले गुण म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीने 'आई' या संकल्पनेवर लादलेले गुण आहेत हे लक्षात येते. त्याचबरोबर वाचन, गायन, लेखन, समाजसेवा, काळाबरोबर बदलून त्यानुसार वर्तन करणाऱ्या आईची लक्षणीय रूपेही अपवादात्मकरीत्या दिसतात. आईवडिलांच्या वयात जास्त अंतर असेल तर त्याचीही दखल आत्मचरित्रकार घेतात. विशेषत: सावत्र आई असेल तर १४-१५ वर्षांचा मुलगा आणि १७ वर्षांची आई (पु. भा. भावे) सहा वर्षाचा मुलगा आणि तेरा वर्षांची आई (वा. गो. मायदेव) एवढेच नव्हे तर वा. वि. बेडेकर यांच्या सावत्र आईपेक्षा ते व त्यांची एक बहीण मोठी होती. गं. नि. गोखले यांची आई ही त्यांच्या वडिलांची तिसरी बायको होती. त्यांच्या वयातही खूप अंतर होते. जवळजवळ आपल्या बरोबरीचा किंवा आपल्यापेक्षा मोठ्या मुलांचाही सावत्र मुले म्हणून स्त्रियांना स्वीकार करावा लागे. याचे आत्मचरित्रकारांना काहीच वेगळे, विशेष वाटत नाही.

आत्मचरित्रकार आईचा विचार व्यक्ती म्हणून न करता 'आई' म्हणून त्यागीवृत्ती, मायाळूपणा, कष्टाळूपणा, सोशीकता इ. गुणांनी युक्त अशी असावी असा करतात. महत्त्वाचे निर्णय घेताना तिचा, तिच्या मताचा विचार केला जात नाही. याला अपवाद शं. वा. किर्लोस्कर.

स्त्रीवादी संकल्पनेनुसार प्रत्येक स्त्रीमध्ये मातृत्वास आवश्यक असे गुण असतातच असे नाही. जैविकदृष्ट्या अशी स्त्री आई बनली तरी तिच्यावर मातृत्व लादले जाते. पुरुषांच्या आत्मचरित्रामधून अशा काही मातांचे चित्र आपणास दिसते. उदाहरणार्थ श्रीपाद जोशी, वि. स. खांडेकर यांची आई.

आत्मचरित्रकारांच्या नकळत्या वयात आईचा मृत्यू झाला असेल तर आत्मचरित्रकारांना एक प्रकारची हुरहूर वाटते. तिच्या सहवासानंतर तिचा मृत्यू झाला असल्यास तिच्याबद्दलची उदात्त भावना त्यांच्या मनात दाटून येते.

कुटुंबांतर्गत होणाऱ्या आईवरील अन्यायाची नोंद आत्मचरित्रकार घेतात. पण तिच्यावरील अन्याय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे होतात याची त्यांना जाणीव झालेली दिसत नाही. त्या अन्यायाची कारणमीमांसा ते करत नाहीत.

सख्ख्या आईप्रमाणे आत्मचरित्रकारांनी आपल्या सावत्र आईचा मोठेपणा वर्णन केला नाही तरी तिच्याबद्दल समाधानाचे उद्‌गार काढतात. सावत्र का होईना ती आपली आई आहे अशी पूज्य उदात्त भावना यामागे दिसते. तर अपवाद म्हणून पु. भा. भावे आपल्या सावत्र आईचा एक व्यक्ती म्हणून विचार करतात.

आत्मचरित्रकार आपली आई आणि पत्नी यांच्या संबंधाचा उल्लेख फारसा करत नाहीत. ज्यांनी असे उल्लेख केले आहेत त्यात दोघांच्या प्रेमाच्या संबंधाबरोबरच वितुष्टाचीही दखल घेतली आहे. अशा वेळी ते तटस्थ राहणे पसंत करतात. आनंद साधले मात्र प्रथम त्या दोघींमधील दुरावा दूर करण्याचा प्रयत्न करतात. पण नंतर आपापल्या जागी त्या दोघी योग्य आहेत अशी भूमिका घेऊन त्या दोघींची मर्यादा मान्य करतात.

आईकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तनाची चाहूल श्रीपाद जोशी, ना. म. पटवर्धन यांच्या आत्मचरित्रात दिसते. श्रीपाद जोशी यांना स्त्रीच्या परात्मतेची जाणीव आहे. पटवर्धन आपल्या आईची एक व्यक्ती म्हणून असणारी मर्यादा मान्य करतात.

***<u>बहीण संदर्भातील निरीक्षणे : -</u>***

एकदा बहिणीचे लग्न झाले की आपल्या घराशी तिचा संबंध तुटला अशा भावनेतून आत्मचरित्रकारांच्या मनात तिच्याबद्दल परकेपणा दिसून येतो. या परकेपणातून बहिणीच्या सासरी होणाऱ्या छळाची कल्पना येऊनही तिला कोणत्याही प्रकारची मदत न करता काहीजण समाजातील आपला नावलौकिक राखण्यासाठी त्या छळातून आपली बहीण कशी तरली याचे उदात्तीकरण करतात. बहिणीच्या प्रतिकूल परिस्थितीत हसतमुख राहण्याच्या वृत्तीबद्दल आदर दाखवतात. पारंपरिक भूमिकेतून विचार करून ते समाजातील आपल्या नावलौकिकाचा विचार करतात. तर आपल्या बहिणीवर अन्याय होतो याची जाणीव झाली तरी त्यांच्या लहानपणीच्या या घटना असल्याने ते प्रत्यक्ष काही करू शकत नाहीत. त्यांच्यावरील अन्यायाचे कारण शोधताना मात्र सामाजिक स्वरूपाच्या अन्यायाची

जाणीव झाली तरी परमार्थाचा आधार घेतला जातो. उदाहरणार्थ, केशवराव भोळे.

चरित्रलेखनाच्या ओघात संदर्भानुसार बहिणींच्या नोंदी केल्या असल्या तरी काही जण अशा नोंदी करतानाही बहिणीच्या गुणविशेषांचा उल्लेख करतात. ज्या बहिणींनी आईच्या मायेने भावांना सांभाळले असेल, मदत केली असेल अशा बहिणींबद्दल आत्मचरित्रकार आदर व्यक्त करतात.

आत्मचरित्रकार बहिणी-पत्नीसंबंधात मौन पाळतात. जे दखल घेतात ते तटस्थ राहतात किंवा काही गोष्टी हातच्या राखून ठेवतात.

बहिणींकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तन होत असल्याचीही चाहूल काही आत्मचरित्रात लागते. काही जण आपल्या बहिणीच्या विशेष गुणाची दखल घेऊन तिला प्रोत्साहन देतात. तर काहीजण तिच्यावरील अन्याय लक्षात येताच तिला योग्य ती मदत करतात.

*पत्नी संदर्भातील निरीक्षणे : -*

पत्नीची निवड करताना बहुसंख्य आत्मचरित्रकार पत्नीच्या रूपाची चिकित्सा करत असले तरी आपल्याला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होईल, सामाजिक हितसंबंध राहतील अशा मुलीचा पत्नी म्हणून स्वीकार करतात. स्वत:च्या मर्यादांच्या जाणिवेतूनही विवाह झालेली दिसतात. प्रेमविवाहातही प्रथम दर्शनी प्रेमापेक्षा सहवासातून निर्माण झालेल्या प्रेमविवाहांची संख्या जास्त आहे. द्वितीय विवाहाच्या वेळी मात्र बहुतांश आत्मचरित्रकार व्यावहारिक दृष्टिकोन ठेवतात.

त्याकाळी स्त्री-पुरुष मैत्रीची परिणती म्हणजे विवाह' याची कल्पना असूनही ना. सी. फडके, श्री. के. क्षीरसागर, विश्राम बेडेकर हे आपल्या द्वितीय पत्नीशी विवाहपूर्व मैत्री वाढवतात. नंतर सोईस्करपणे विवाहाची टाळाटाळ करतात. पण परिस्थितीच्या रेट्यामुळे शेवटी विवाहास संमती द्यावी लागल्यावर त्या प्रसंगाची मांडणी ते 'आपल्या मनाचा कौल घेऊन विवाह' किंवा 'साथीदाराच्या सुखासाठी विवाह' अशा रूपात करतात. त्यातून स्वत:चा मोठेपणा दाखवण्याचा प्रयत्न करतात.

स्त्रियांना शिक्षण देण्याची आवश्यकता अनेकांना पटली असली तरी दिले जाणारे शिक्षण धर्म, संस्कृतीचे जतन करणारे असावे. बालसंगोपन, गृहकृत्ये यांच्याशी संबंधित असावे असे मत दिसते. परंपरेने मान्य केलेल्या क्षेत्रात आणि आर्थिक आवश्यकता असेल तरच नोकरीची परवानगी दिली जाते. मात्र त्यामुळे घरकामाचा आपला वाट उचलण्याची मानसिकता दिसत नाही. पत्नी म्हणजे 'गृहिणी, सचिव: सखी, मिथ: प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।' अशी अपेक्षा ठेवली तरी आत्मचरित्रकारांचे वर्तन मात्र तसे दिसत नाही. पत्नीमध्ये संस्कृतीने मान्य केलेले 'स्त्रीत्वाचे' गुणविशेष असतील तर त्याचा आत्मचरित्रकार उल्लेख करतात. अनेकजण यशस्वी आयुष्याचे श्रेय पत्नीला देतात. त्याबद्दल ते कृतज्ञता व्यक्त करतात. अर्थात ही मदत दुय्यम स्वरूपाची, तसेच ती गृहीतच धरली होती असे दिसते. काहींना आपल्यामुळे पत्नीवर अन्याय झाला याची जाणीव होते. अगदीच थोडे आत्मचरित्रकार त्या अन्यायाचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात. आपले जीवन यशस्वी होण्यासाठी पत्नीने ज्या तडजोडी केल्या, तिने जो पाठिंबा दिला त्यावरून तिच्या आयुष्यभराच्या कष्टाची, तिच्यावरील छुप्या

अन्यायाची जाणीव होते. अन्यायाचे परिमार्जन आपण कसे केले हे सांगण्यातही त्यांची पुरुषप्रधानता दिसते.

पत्नीला दुय्यम स्थान देण्याचीच भूमिका आत्मचरित्रकारांची असली तरी स्वत:पुरत्या मर्यादित स्वरूपात का होईना तिच्या अंगच्या कलागुणांना ते वाव देतात. मो. वा. जोशी आपल्या द्वितीय पत्नीला गायन शिकण्यास उत्तेजन देतात. ना. सी. फडके द्वितीय पत्नी कमला हिच्या अभिनय गुणांना विरोध करतात. पण लेखनगुणांना प्रोत्साहन देतात. ग. य. चिटणीस आपली पत्नी लीला हिच्या अंगच्या अभिनय गुणांना उत्तेजन देतात. थोडक्यात गृहकृत्ये सांभाळून पत्नीच्या अंगच्या कला-गुणांना वाव देण्याची वृत्ती मर्यादित स्वरूपात का होईना निर्माण झाल्याचे दिसते.

पत्नीच्या ज्या आवडीमुळे, सवईमुळे, गुणामुळे आत्मचरित्रकारांना आपले स्वातंत्र्य उपभोगता येत नाही किंवा काही जबाबदारी त्यांना अंगावर घ्यावी लागते त्या आवडीबद्दल, गुणांबद्दल ते तक्रार करतात.

अपत्य जन्माच्या संदर्भात ते पत्नीच्या स्वास्थाचा, अनुकूलतेचा फारसा विचार करत नाहीत. तिच्या मृत्यूमुळे काव्यात्मक, हताश उद्गार काढले तरी त्यांचे वर्तन व्यवहारवादी दिसून येते. आत्मचरित्रांवरून असे दिसून येते की, अनेकजणींचा मृत्यू क्षयाने झाला आहे. यामागे त्यांना मिळणारा अपुरा, असमतोल आहार. लहान वयातील मातृत्व. मानसिक दबाव किंवा कोंडलेपणा अशी पुरुषप्रधान संस्कृतीच्या मानसिकतेमुळे निर्माण झालेली कारणेच आहेत हे लक्षात येते.

आत्मचरित्रकारांची पत्नीसंबंधीची भावना पाहिली तर तिच्यावर आपली मालकी असल्याची स्वामित्वाची भावना दिसते. काही ठिकाणी पत्नीकडून मातृत्वाच्या वत्सलतेची अपेक्षा दिसते. एकंदरीत पत्नीकडे ती दुय्यम स्थानावर असल्याच्या भावनेतून आत्मचरित्रकार पाहतात. लेखनाच्या माध्यमातून स्वत:ला व्यक्त करण्याचा असलेला पत्नीचा सृजनात्मकतेचा हक्कही ते नाकारतात.

असे दुय्यम स्थान पत्नीला दिल्यानेच शिक्षित, बुद्धिवान पत्नीनेही परंपरागत रीतीने पतीची सेवा करावी अशी अपेक्षा दिसते. पत्नीने अनेक तडजोडी करून संसार यशस्वी केला असेल तर त्या मागील तिच्या मानसिक, शारीरिक त्रासाकडे दुर्लक्ष करून तिच्या वर्तनाचे उदात्तीकरण करण्याची प्रवृत्ती दिसते. आपल्या सर्व कामात, निर्णयात पत्नीला गृहीत धरलेले दिसते. पत्नीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असू शकते. तिला मोकळा अवकाश असू शकतो. याचा ते स्वीकार करत नाहीत. तिने आपल्या आकांक्षांचा बळी देऊन पतीला संतुष्ट ठेवावे असा आदर्श घालून देतात. पत्नीसाठी वेगळा न्याय आणि आपल्यासाठी वेगळा न्याय असे त्यांचे दुटप्पी वर्तन दिसते.

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना अनेकविध प्रकारे दडपून टाकले असले तरी काही स्त्रिया मात्र त्यातूनही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करतात असे आत्मचरित्रात दिसते. अशा आपल्या पत्नीच्या मनाच्या कणखरपणाचा आपल्यातील न्यूनगंड दूर करून आपला स्वाभिमान जागवल्याचा आत्मचरित्रकार उल्लेख करतात. यावरून पत्नीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल होत असल्याचे दिसते.

*मुली संदर्भातील निरीक्षणे : -*

आत्मचरित्रकार स्वत: लहान असल्यामुळे आई आणि बहिणीसंदर्भात काही करू शकत नव्हते अशा विचाराशी सहमत होता येते. पण स्वत:च्या मुलीच्या बाबतीत अशी परिस्थिती नसून उलट त्यांच्या आयुष्याला आकार देण्याचे कार्य त्यांनाच करावयाचे होते. तरीही त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात फारसा बदल झाला असे दिसत नाही.

मुलींना शिक्षण देण्याचे प्रमाण वाढले असले तरी ते बहुतांशी गृहोपयोगी, योग्य पती निवडीस मदत करणारे आणि तिचे लग्न होईपर्यंतच दिले जाते. मुलीचे लग्न करून देणे हेच त्यांचे महत्त्वाचे कर्तव्य ते मानतात. असे असले तरी गृहकृत्ये सांभाळून तिच्या व्यक्तिमत्त्वास मर्यादित स्वरूपात वाव देण्याची वृत्ती निर्माण झाल्याची दिसते. पण परंपरेला मान्य नसलेले कलागुण जोपासण्यास नकार दिला जातो.

अपवाद म्हणून श्रीपाद जोशी आपल्या मुलीने स्त्रीमुक्ती संदर्भात काही कार्य करावे अशी अपेक्षा ठेवतात. पण त्यांची स्त्रीमुक्तीची संकल्पनाच चुकीची आहे. असाच अपवाद आनंद साधले यांचा दिसतो. ते आपल्या मुलींना त्यांच्या नैसर्गिक वृत्तीप्रमाणे वाढण्यास हरकत घेत नाहीत.

आत्मचरित्रांचे वाचन करत असताना 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या वचनाचा प्रत्यय येतो. त्यामुळे आपल्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या आई, बहीण, पत्नी, मुलगी या स्त्रियांशी त्यांचे असणारे भावनिक नातेसंबंध यात भिन्नता दिसून येते. एवढेच नाही तर एकाच आत्मचरित्रकाराचा या चारही नात्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असल्याचे दिसून येते. श्रीपाद जोशी उदाहरणादाखल आपल्या आईची व्यक्ती म्हणून नोंद करतात. तर बहिणीच्या अन्याय सहन करण्याच्या वृत्तीचे उदात्तीकरण करतात. आपल्या आईवडिलांच्या रूप आणि गुणांच्या विजोडपणाची ते दखल घेतात. पण स्वत: काळे असूनही गोऱ्या पत्नीची अपेक्षा ठेवतात. तिला कराव्या लागणाऱ्या तडजोडींना 'आत्मविलोपन' असे संबोधतात. तर मुलीकडून स्त्रीमुक्तीच्या संदर्भात कार्य होण्याची अपेक्षा करतात. पु. भा. भावे स्वत:च्या सावत्र आईला घरात मोकळीक मिळाली नाही याची खंत व्यक्त करतात. तर उत्कृष्ट गाणाऱ्या, विविध भाषा समजणाऱ्या, अनेक कथाबिजे सुचवणाऱ्या पत्नीच्या केवळ घरातील कामे करण्याच्या, सतत कामात राहण्याच्या वृत्तीचा गौरव करतात.

पुरुषप्रधान संस्कृतीने 'स्त्री'चे म्हणून जे रूप मान्य केले आहे त्याचा विचार आईच्या संदर्भात करत नाहीत. तिच्या वास्तवरूपाचा स्वीकार करतात. मात्र पत्नीच्या रूपाची चिकित्सा करतात. आईवर कुटुंबांतर्गत होणाऱ्या छुप्या अन्यायाची (दिवसभर कंटाळवाणी दिनचर्या असणे, सतत बाळंतपणे, नवऱ्याच्या एखाद्या लहरीखातर किंवा निष्ठेखातर आर्थिक तणावाखाली राहणे, त्यासाठी झळ सोसणे) ते दखल घेतात. तरीही त्यांच्या पत्नीला असेच छुपे अन्याय सहन करावे लागले असेही आत्मचरित्रावरून दिसून येते. उदाहरणार्थ - श्री. म. माटे यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर आईने त्यांना लहानाचे मोठे

केले ते प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत. तसेच त्यांच्या स्वत:च्या समाजसुधारणेवरील निष्ठेमुळे त्यांच्या पत्नीलाही आर्थिक झळ सोसावी लागते.

स्वत:ला समाजसेवा, स्वातंत्र्यचळवळ, कलेची उपासना (नाट्यक्षेत्र) यासाठी वाहून घेताना घरातील आर्थिक परिस्थिती अनुकूल आहे किंवा नाही याचा आत्मचरित्रकार विचार करत नाहीत. एखाद्या ध्येयासाठी स्वत:ला वाहून घेताना आपल्या बायकामुलांच्या उदरनिर्वाहाची ते फारशी काळजी करत नाहीत असे दिसते.

आत्मचरित्रांचे वाचन केल्यावर असे लक्षात येते की, केवळ शिक्षण, विशिष्ट व्यवसाय, विशिष्ट भूभाग किंवा शहर, विशिष्ट जात यावर आत्मचरित्रलेखकांचा घरातील स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरतो असे म्हणजे धाडसाचे ठरेल. पुरोगामी विचार मांडणारे लेखकही घरातील स्त्रियांसंदर्भात पारंपरिक दृष्टी ठेवतात असे दिसते. तसेच एकाच व्यक्तीची काही बाबतीत पारंपरिक तर काही बाबतीत पुरोगामी दृष्टी असल्याचेही दिसून येते.

*दलित आत्मकथनातील स्त्रीरूपे : -*

दलित आत्मकथनकार समाजातील स्वत:चे दुय्यमत्त्व नाकारण्यासाठी विद्रोह पुकारतात. मात्र ते आपल्याबरोबर आपल्या घरातील स्त्रियांना सहभागी करून घेत नाहीत. त्या संदर्भात त्यांचे वर्तन पांढरपेशी परंपराप्रिय पुरुषांप्रमाणे दिसते.

*आई संदर्भातील निरीक्षणे : -*

आत्मकथनकारांना आईच्या कष्टांची जाणीव आहे. तसेच आईवरील कुटुंबांतर्गत अन्यायाची नोंद ते घेतात. पण त्यात त्यांना काही गैर वाटत नाही. स्त्रियांवर असे अन्याय होणारच अशी त्यांची भावना दिसते. दलितांना शिक्षण मिळून ते परंपरागत कामामधून मुक्त झाले. याचे कारण त्यांना मिळालेले शिक्षण. या शिक्षणासाठी त्यांच्या आईने दिलेल्या योगदानाची यांना जाणीव आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग आईला अंधश्रद्धेतून बाहेर काढण्यास ते फारसा प्रयत्न करत नाहीत. तसेच आई आणि पत्नी यांच्या संबंधाबाबत दया पवार यांचा अपवाद सोडता बाकी सर्वजण मौन राखतात असे दिसते. तिने लावलेल्या शिस्तीचा, केलेल्या संस्काराचा त्यांना अभिमान दिसतो.

*बहीण संदर्भातील निरीक्षणे : -*

दलित आत्मकथनकारांच्यातही बहिणीचे लग्न झाल्यावर परकेपणाची भावना असे दिसते. तिच्या कष्टाची, तिच्यावरील अन्यायाची जाणीव त्यांना आहे. तिला मदत करताना तिची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करताना ते शक्य असूनही ठोस उपाय करण्यापेक्षा तात्पुरते उपाय करताना दिसतात. बहिणी आणि पत्नी यांच्या संबंधाचा फारसा उल्लेख करत नाहीत.

## *पत्नी संदर्भातील निरीक्षणे : -*

दलित आत्मकथनकार पत्नीकडेही दुय्यम स्थान देण्याच्या भूमिकेतून पाहतात. शक्य असल्यास रूपाची चिकित्सा करतात. तरी वास्तवं लक्षात घेऊन पत्नीचा स्वीकार करतात. इतरत्र निघू न शकणारा राग काढण्याचे साधन, सवर्ण पत्नी असेल तर सवर्णांनी युगानुयुगे केलेल्या अन्यायाचा बदला घेण्याचे साधन अशा रूपात तिच्याकडे पाहतात. पत्नीला शिक्षण देण्याचा, तिला चळवळीत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न ते करताना दिसत नाहीत.

## *मुली संदर्भातील निरीक्षणे : -*

आत्मकथनकारांनी शिक्षण संपल्यावर लवकरच आत्मकथने लिहिल्यामुळे त्यात त्यांच्या मुलींचे चित्रण फारसे आले नाही. दया पवार यांचा अपवाद वगळता इतरांनी मुलीविषयी फारसे लेखन केले नाही. त्यामुळे मुलींकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कशी आहे यावर फार प्रकाश पडू शकत नाही. पण जे उल्लेख आले आहेत ते परंपराप्रिय असेच असल्याचे जाणवते.

एकंदरीत दलित आत्मकथनकारांनी निभावलेली पुत्र, भाऊ, पती, पिता, यांची भूमिका पारंपरिक आहे. स्त्रीला विविध नात्यांनी बांधून ठेवणारी व तिच्यावर वर्चस्व गाजवणारी अशी ती आहे. फुले, आंबेडकर यांचा वारसा सांगून ते समाजात स्वत:साठी समतेचा आग्रह धरत असले तरी आपल्या समाजातीलच स्त्रियांचे स्वातंत्र्य व समता ते नाकारतात. त्यांच्या मनावर पारंपरिक पुरुषप्रधान वृत्तीची दाट सावली पडल्याचे दिसते. समाजपरिवर्तनाची इच्छा धरणाऱ्या दलित समाजाची आजची औपचारिक घोषणा आणि त्यांच्या स्वत:च्या जीवनातील आंतरिक वास्तव यातील अंतर लक्षात येण्याच्या दृष्टीनेही दलित आत्मकथनातील हे स्त्रीरूप विचारात घेण्यासारखे आहे.

थोडक्यात काही प्रमाणात स्त्रियांचे शिक्षण नोकरी वगैरे संदर्भात बदलाची भूमिका आत्मचरित्रकार घेत असले, काही ठिकाणी त्यांच्या सुधारक विषयक मतात विसंगती जाणवली तरी पारंपरिक मिथकांच्या रूपातच ते आई, बहीण, पत्नी, मुलगी यांचे चित्रण करतात. स्त्रीवादी विचारसरणीला अपेक्षित समानता त्यांनी स्वीकारल्याचे दिसत नाही. मात्र त्या दिशेने पावले टाकली जात आहेत अशी चिन्हे दिसतात. तर आत्मकथनकार या संदर्भात बरेच मागे असल्याचे जाणवते.

❑ ❑ ❑